# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०४/२०२४ (शुक्रवार) दुपार**


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कार्यवाही

दिनांक ०४/०४/२०२४ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहीती मिळाली की, मौजा नक्षी शिवार भिवापुर येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मौजा नक्षी शिवार भिवापुर येथे नाकाबंदी केली असता घटनास्थळावर लाल रंगाचे ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/सी यु—५५८८ चा चालक **आरोपी नामे— प्रभु सुखदेव मेश्राम, वय ५० वर्ष, रा. घाटउमरी त. भिवापुर जि. नागपुर २) वैभव सरोदे, वय ३५ वर्ष, रा. सुसुंद्री त. भिवापुर जि. नागपुर** हे अवैदयरित्या विनापरवाना ट्रॅक्टरचे ट्रॉली मध्ये शासनाचा महसुल बुडवुन रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून अवैधरीत्या विनापरवाना ०१ ब्रास रेती किंमती ५०००/—रू तसेच लाल रंगाचे ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/सी यु—५५८८ किंमती १,५०,०००/— रू., लाल रंगाची ट्रॉली विना क्रमांकाची किंमती ८०,०००/—रू. असा एकुण २,३५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— **परी पोउपनि. किरण महागावे पोलीस स्टेशन भिवापुर** यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द अप क्र. १५३/२०२४ कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर यांचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक जयप्रकाश निर्मल, **परी पोउपनि. किरण महागावे**, पोलीस अंमलदार रवि वानखेडे, शुभम ताकोड यांनी केली.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर